दैनिक
# व्याघ्र शौर्यम
उशीरा दिलेला न्याय हा अन्यायासारखाच असतो.
epaper.vyaghrashuryam.com vyaghrashuryam.com vyaghrashuryam@gmail.com
▪ जळगाव ▪ वर्ष - 1 ▪ अंक - ३३२ ▪ गुरुवार, दि.०३ सप्टेंबर २०२६ Reg. No.MHMAR/25/A2382 ▪ पाने - 8 ▪ किंमत रु.2

# अपहरण-अत्याचाराच्या आरोपानंतर मोठा ट्विस्ट!

## मुलासोबत राहण्याची इच्छा : रावेरची तरुणी तीन महिन्यांनी आरोपीच्या घरी

**जळगाव ।** अपहरण करून गुंगीचे औषध पाजल्याचा, बेशुद्धावस्थेत आळंदी येथे विवाह लावल्याचा आणि पुण्यात अत्याचार केल्याचा आरोप करत एका तरुणासह त्याच्या कुटुंबातील १० जणांविरुद्ध पोलिसांत तक्रार देणारी तरुणी तब्बल तीन महिन्यांनंतर पुन्हा संबंधित तरुणाच्या घरी पोहोचली आहे. या घटनेमुळे रावेर तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, तरुणीने पोलिसांसमोर दिलेल्या सध्याच्या जबाबात आपण सज्ञान असून स्वतःच्या इच्छेने संबंधित तरुणासोबत राहण्याचा निर्णय घेतल्याचे लेखी नमूद केले आहे. त्यामुळे काही महिन्यांपूर्वी दाखल झालेल्या गंभीर आरोपांच्या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. तरुणीच्या बदललेल्या भूमिकेमुळे पोलिसांसमोरही या प्रकरणातील परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे.

रावेर तालुक्यातील एका गावातील तरुणाविरुद्ध तसेच त्याचे भाऊ, चुलतभाऊ, वहिनी, वडील, काका आणि मावसभाऊ अशा कुटुंबातील एकूण १० जणांविरुद्ध संबंधित तरुणीच्या तक्रारीवरून काही महिन्यांपूर्वी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या तक्रारीनुसार, हतनूर पुलाजवळून आपले अपहरण करण्यात आल्याचा आरोप तरुणीने केला होता. त्यानंतर आपल्याला गुंगीचे औषध पाजण्यात आले आणि बेशुद्धावस्थेत आळंदी येथे नेऊन संबंधित तरुणासोबत



विवाह लावण्यात आल्याचे तिने पोलिसांना सांगितले होते. त्यानंतर पुणे येथे आपल्यावर अत्याचार करण्यात आल्याचाही आरोप तिने आपल्या तक्रारीत केला होता. या प्रकरणाचा तपास सुरू असतानाच दि. १ सप्टेंबर रोजी संबंधित तरुणी आरोपी तरुणाच्या घरी आल्याची माहिती रावेर पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने महिला पोलीस कर्मचाऱ्यांसह पथक संबंधित ठिकाणी पाठवले. पोलिसांनी तरुणीला पोलीस ठाण्यात आणल्यानंतर तिचा सविस्तर जबाब नोंदवण्यात आला. यावेळी दोन्ही कुटुंबीयांनाही पोलिसांनी बोलावून घेतले. मात्र, या वेळी तरुणीने पूर्वीच्या तक्रारीपेक्षा वेगळी भूमिका घेतल्याचे समोर आले. या प्रकरणात तरुणीने पूर्वी केलेल्या आरोपांची आणि आता पोलिसांसमोर दिलेल्या जबाबाची वस्तुनिष्ठ पडताळणी होणे महत्त्वाचे ठरणार आहे. तपासादरम्यान समोर येणारे पुरावे, संबंधित व्यक्तींचे जबाब, उपलब्ध कागदपत्रे आणि इतर बाबींच्या आधारेच प्रकरणाची पुढील दिशा निश्चित होणार आहे. दरम्यान, तरुणीच्या पूर्वीच्या तक्रारीतील गंभीर आरोप आणि त्यानंतर तिने पोलिसांसमोर घेतलेली सध्याची भूमिका यामुळे रावेर तालुक्यात या प्रकरणाची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

**पोलिसांसमोर स्वेच्छेने राहणार असा जबाब**

पोलिसांसमोर दिलेल्या जबाबात तरुणीने आपण सज्ञान असल्याचे स्पष्ट केले असून, संबंधित तरुणासोबत स्वतःच्या इच्छेने राहण्याचा निर्णय घेतल्याचे नमूद केले आहे. तसेच, आई-वडिलांशी चर्चा करण्यासही तिने नकार दिल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे काही महिन्यांपूर्वी करण्यात आलेले गंभीर आरोप आणि आता पोलिसांसमोर नोंदवण्यात आलेला सध्याचा जबाब यामध्ये स्पष्ट फरक दिसून येत आहे.

# संकटात नेहमी मदतीचा हात!

## अभिनेता सोनू सूद नेपाळमधील पूरग्रस्तांच्या मदतीला धावला

**मुंबई ।** नेपाळमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे मोठं नुकसान झालं आहे. अनेक लोकांनी आपले आप्तस्वकीय गमावले आहेत, तर अनेक जण अजूनही बेपत्ता आहेत. अशा कठीण काळात पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी बॉलिवूड अभिनेता सोनू सूद थेट नेपाळमध्ये पोहोचला आहे. त्याने पीडित लोकांची भेट घेऊन त्यांना मदतीचा हात दिला आहे.

सोनू सूदने सोशल मीडियावर तेथील लोकांसोबतचे फोटो शेअर केले आहेत. तो



म्हणाला, या लोकांनी आपली घरं आणि कुटुंब गमावलं आहे. पण आपण सगळे मिळून त्यांना पुन्हा उभं राहण्यासाठी मदत करू. नेपाळ, तुम्ही या संकटात एकटे नाही आहात. सोनूने सांगितलं की, तो भारतातून खाद्यपदार्थ, ब्लँकेट्स आणि इतर गरजेचं सामान घेऊन आला आहे. ही मदत पुढेही सुरूच राहील, असं आश्वासन त्याने दिलं. सोनू सूदच्या या कामामुळे लोक सोशल मीडियावर त्याचं खूप कौतुक करत आहेत. पडद्यावरचा व्हिलन पण खऱ्या आयुष्यातला हिरो!, भारताला तुमचा अभिमान आहे अशा कमेंट्स करून लोक त्याला दाद देत आहेत.

# सोन्याच्या दरात अचानक मोठी घसरण

**मुंबई ।** भारतीय सराफा बाजारात सोन्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. मागील काही दिवसांपासून सोन्याच्या दरात चढ-उतार सुरू असून, मंगळवारी झालेल्या वाढीनंतर बुधवारी बाजारात सोन्याच्या दरात मोठी कपात झाली. २४ कॅरेट सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम तब्बल २,०७० रुपयांची घसरण झाली आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात सोने खरेदी करणाऱ्या ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. २४ कॅरेट सोन्याचा दर २,०७० ने कमी होऊन प्रति १० ग्रॅम१,५२,०२० वर आला आहे. तर २२ कॅरेट सोन्याच्या दरात १,९०० ची घसरण झाली असून, त्याचा भाव प्रति १० ग्रॅम १,३९,३५० इतका झाला आहे. १८ कॅरेट सोन्याचाही दर कमी झाला आहे. मुंबई, चेन्नई, कोलकाता, बंगळुरू, हैदराबाद, केरळ आणि पुणे येथे २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति ग्रॅम १५,२०२, तर २२ कॅरेट सोन्याचा दर १३,९३५ आहे. दिल्लीमध्ये २४ कॅरेट सोन्याचा दर १५,२१७ आणि २२ कॅरेट सोन्याचा दर १३,९५० आहे. वडोदरा आणि अहमदाबादमध्ये २४ कॅरेट सोन्याचा दर १५,२०७, तर २२ कॅरेट सोन्याचा दर १३,९४० आहे. दरम्यान, सोन्याच्या दरातील ही घसरण ग्राहकांसाठी खरेदीची संधी ठरू शकते.

# अमेरिका-इराणमध्ये पुन्हा संघर्षाची ठिणगी

## अमेरिकेचा इराणवर हल्ला : एरबिलमधील तळावर क्षेपणास्त्रांचा मारा

**तेहरान :** अमेरिका आणि इराणमधील तणाव पुन्हा एकदा वाढला आहे. अमेरिकन सैन्याने मंगळवारी इराणमधील इराणी रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सशी संबंधित अनेक ठिकाणांवर हल्ले केले. त्यानंतर इराणने प्रत्युत्तर देत उत्तर इराकमधील एरबिल प्रांतातील अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनद्वारे संयुक्त हल्ला केल्याचा दावा केला आहे.

अमेरिकेच्या यूएस सेंट्रल कमांडने सोशल मीडिया पोस्टद्वारे इराणवरील कारवाईची माहिती दिली. अमेरिकन सैन्याने एअर डिफेन्स साइट्स, रडार यंत्रणा, सागरी सुविधा, माइन बिछावण्याची क्षमता आणि कम्युनिकेशन साइट्सवर हल्ले केल्याचे सांगण्यात आले आहे. अमेरिकन सेंट्रल कमांडच्या म्हणण्यानुसार, होर्मुज सामुद्रधुनीत व्यापारी जहाजे आणि अमेरिकन सैनिकांना लक्ष्य करण्याच्या कथित अलीकडील प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली. सध्या मध्यपूर्वेत ५० हजारांहून अधिक अमेरिकन सैनिक तैनात असल्याचे सांगितले जाते. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणने उत्तर इराकमधील एरबिलमधील अमेरिकन तळांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा



केल्याचा दावा केला आहे. दक्षिण किनारपट्टीवरील सिरिक शहरात एका विवाह सोहळ्यावर झालेल्या अमेरिकन हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आल्याचे म्हटले आहे. या हल्ल्यात एका मुलासह चार जणांचा मृत्यू झाल्याचा इराणचा दावा आहे.

इराणच्या सरकारी प्रसारमाध्यमांनुसार, या हल्ल्यात एका दुरुस्ती केंद्रासह तांत्रिक उपकरणे असलेली गोदामे उद्ध्वस्त झाली. तसेच अमेरिकन सर्व्हिलन्स बलूनच्या मार्गदर्शन यंत्रणेचेही नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तळावरील इंधन टाक्यांना आग लागली आणि काही अमेरिकन सैनिकांचा मृत्यू झाल्याचाही दावा केला आहे. मात्र, या दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

cmyk

## संपादकीय

# ही कसली समृद्धी?

महामार्ग जोडणारे असावेत; तोडणारे नसावेत. लुटणारे तर नसावेच नसावे. ज्या समृद्धी महामार्गाचे स्वप्न महाराष्ट्राने मोठ्या अपेक्षेने बघितले त्याच्या पूर्तीने मुंबई–नागपूर प्रवासाचे तास घटविले. वेगाला नवे परिमाण दिले. त्या रस्त्यावर छोट्यामोठ्या गाड्या सुसाट वेगाने धावतात. त्याचे कौतुक आहेच; पण आजकाल त्यावर त्यापेक्षाही अधिक वेगाने दरोडेखोरांच्या गाड्या धावत आहेत. सामान्य जनतेला लुटत आहेत. त्यांच्या मनात दहशत निर्माण करीत आहेत आणि आपली सुरक्षा यंत्रणा मात्र तोकडी ठरत आहे, याची घोर चिंता आहे.

मध्यरात्रीच्या अंधारात आणि दिवसाच्या उजेडात समृद्धीवर पडत असलेले दरोडे विकसित महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेला शोभणारे निश्चितच नव्हेत. हा महामार्ग साधा मार्ग नव्हे. त्या मार्गाहून विदर्भ, मराठवाडा, खान्देशातील शेतकरी आपल्या विकासाची गाडी वेगाने मुंबईच्या दिशेने घेऊन जातील आणि उन्नत्तीचा मार्ग गाठतील ही त्यामागील मूळ भावना. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती देणे हाच त्याचा खरा उद्देश. मात्र प्रारंभीच्या काळात घडलेल्या अपघातांच्या भयंकर मालिकांनी या महामार्गाला कुप्रसिद्धीच्या वाटेवर नेले. अपघात रोखण्यासाठी प्रयत्नही झाले. त्याचवेळी आणखी एक काळी सावली तिथे पडू लागली. ती म्हणजे दहशतीची, दरोड्यांची. गुरुवारी मध्यरात्री सिन्नर तालुक्यातील मलढोण व दुशिंगपूर शिवारातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर दरोडेखोरांनी लोखंडी धारदार वस्तू फेकत दीड तास हैदोस घातला. छत्रपती संभाजीनगरच्या एका वकिलाची गाडी पंक्चर करीत, त्यांना मारहाण करीत लाखोंचा ऐवज लुटला. आणखी दोन गाड्यांना असेच लक्ष्य केले. ही झाली रात्रीची घटना. गुरुवारीच उत्तराखंडहून दर्शन घेऊन परतणाऱ्या राहुरीच्या व्यापाऱ्याला तर त्यांनी भरदिवसा सिनेस्टाइल लुटले. त्याच्या फॉर्च्युनर गाडीचा तीन गाड्यांतून पाठलाग केला. त्याला घेरले. उतरायला भाग पाडले. शिवीगाळ केली. गळ्यातील अडीच तोळ्याची सोन्याची साखळी लुटली.

आपण गाडीच्या डॅश कॅमेऱ्यात चित्रित होत आहोत हे लक्षात येताच ते दहा–बारा जण पळून गेले. नांदेडच्या व्यापाऱ्यालाही काही दरोडेखोरांनी अडविले होते. त्याने बंदुकीचा बार काढताच हे पळून गेले. या सगळ्या घटना काही तासांत पाठोपाठ घडल्या म्हणून चर्चेत आल्या. यापूर्वी याच महामार्गावर कोट्यवधीच्या लुटी झाल्या आहेत. खामगावहून सोने घेऊन निघालेल्या मुंबईच्या सराफा व्यापाऱ्याचे साडेचार किलो सोने मेहकर टोलनाक्याच्या रस्त्याहून पळविले. दुसरबीडच्या टोलनाक्यावरून बारा लाखांसह स्कॉर्पिओ गाडी पळविली होती. गाडी बंद पडली म्हणून कोपरगावजवळ थांबलेला परिवार असाच लुटला गेला.

घृष्णेश्वराचे दर्शन घेऊन उल्हासनगरकडे जाणाऱ्या भाविकांना सिन्नर येथे मारहाण केली. लुटले. करमाडचे डॉक्टर दाम्पत्यही त्याच धक्कादायक अनुभवातून गेले. अशा किती घटना सांगाव्यात! केवळ पैसे किंवा दागिने हेच यांचे लक्ष्य नाही. ते इतके सराईत आहेत की, जे हाती लागेल ते लुटतात. भिवंडीहून कोलकात्याकडे जाणाऱ्या चालत्या ट्रकमधून त्यांनी अडीच कोटी रुपये किमतीच्या लशी पळविल्या. डिझेल घेऊन येणारे दोन ट्रक इंजिन थंड व्हावे म्हणून रस्त्याच्या कडेला थांबले होते. चालकांचा डोळा लागला. बघता बघता त्यांच्या ट्रकमधून पाचशे लिटर डिझेल पळविले. जालन्यात तर टाकी फोडून डिझेल पळविले.

खरे तर समृद्धी हा प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग. टोलनाके, सीसीटीव्ही, महामार्ग पोलिसांचे जाळे; तरी दरोडेखोर महामार्गावर येतात कुठून? लूट करून त्यांची वाहने कोणत्या मार्गाने पसार होतात? महामार्गालगत चोरवाटा किंवा अनधिकृत प्रवेशमार्ग आहेत का? स्थानिक गुन्हेगारांना महामार्गावरील प्रवाशांची आणि मोठ्या आर्थिक व्यवहारांची माहिती मिळते कशी? या प्रश्नांचा छडा लावणे महत्त्वाचे आहे. आता दरोड्यांचे ब्लॅक स्पॉट शोधण्याची वेळ आली आहे. आपत्कालीन यंत्रणा सक्षम व्हावी. संशयास्पद वाहनांवर तातडीने लक्ष ठेवणारी यंत्रणा उभी राहावी. दरोडेखोरांचे आंतरजिल्हा व आंतरराज्यीय नेटवर्क उखडून काढले जावे. अन्यथा आधी ज्या मार्गावर अपघाताने माणसे मरत होती, आता त्या मार्गावर प्रवाशांच्या मनातील निर्भयता मरेल. महाराष्ट्र म्हणजे सुखरूप प्रवास ही ओळख संपेल. विकासाचा मार्ग, दरोडेखोरांच्या दहशतीचा मार्ग बनणे, महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेसाठी शोभेचे नाही. समृद्धीसाठी तर नाहीच नाही!

# मराठीसक्तीबाबत माघार नाही!

रिक्षा–टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य करण्याच्या निर्णयास एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली असली, तरी सरकारने याबाबत माघार घेतलेली नाही, असे राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. या मुद्द्यासह ओला–उबरचे भाडे, रॅपिडोची दुचाकी सेवा, परिवहन विभागाचा आगामी अजेंडा आदी विविध मुद्द्यांवर त्यांनी साधलेला संवाद...

रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठीसक्तीचा निर्णय एक वर्ष पुढे गेला आहे. त्याकडे आपण कसे पाहता?

चालकांना मराठी शिकण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ दिली असली तरी मराठीसक्तीपासून सरकारने एक पाऊलही मागे घेतलेले नाही. १२ ऑगस्ट २०२६चा सुधारित कायदा रद्द झालेला नाही; केवळ त्याची अंमलबजावणी एक वर्ष पुढे ढकलण्यात आली आहे. २८ ऑगस्ट २०२७पासून नव्या कायद्याची अंमलबजावणी होईल. त्यामुळे ही मुदतवाढ म्हणजे माघार नाही, तर ज्यांना मराठी येत नाही त्यांना मराठी शिकण्यासाठी दिलेली शेवटची संधी आहे. महाराष्ट्रात राहायचे, महाराष्ट्राच्या जनतेकडून रोजगार घ्यायचा आणि या मातीतल्या भाषेचा सन्मान करायचा नाही, हे चालणार नाही. रिक्षा–टॅक्सी चालक प्रवाशांशी थेट संवाद साधतात. त्यामुळे त्यांना किमान व्यवहारापुरती मराठी येणे ही केवळ सक्ती नसून सामाजिक जबाबदारी आहे. विरोधकांनी या विषयाचे उगाच राजकारण करू नये. मराठीचा आग्रह कोणाच्याही विरोधात नाही; मात्र मराठीचा अपमान आम्ही सहन करणार नाही.

काही चालकांकडून सरकारच्या निर्णयाबाबत अरेरावीची भाषा केली जात असल्याच्या तक्रारी आहेत. अशा चालकांना काय सांगाल? अंमलबजावणी करताना सरकारची भूमिका काय असेल?

मुदतवाढ मिळाली म्हणून काहींनी विजयाचा जल्लोष आणि उन्माद करून महाराष्ट्राच्या भाषेला आणि मराठी माणसाच्या भावनांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला, तर त्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी – ही मुदतवाढ संयमाची आहे, तो सरकारचा दुबळेपणा नाही. १०७ हुतात्म्यांच्या बलिदानातून महाराष्ट्र उभा राहिला आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी मराठी माणसाने रक्त सांडले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या मातीत उभे राहून महाराष्ट्राच्या भाषेला कमी लेखण्याचा अधिकार कोणालाही नाही. मी स्पष्ट सांगतो – कायद्याचा सन्मान करा, मराठीचा सन्मान करा आणि महाराष्ट्राचा सन्मान करा. ज्यांना मराठी येत नाही, त्यांना हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी संवाद अभियानच्या माध्यमातून शिकण्यासाठी वेळ आणि संधी दिली जाईल. गणपती उत्सवानंतर, १ ऑक्टोबरपासून त्याचे वर्ग सुरू होतील. पण ही संधी कायमची नाही. २८ ऑगस्ट २०२७नंतर कायदा आणि नियमांची अंमलबजावणी सुरू झाल्यावर जाणीवपूर्वक नियम मोडणाऱ्यांवर कोणतीही दया दाखवली जाणार नाही.

प्रवासी आणि चालक या दोन्ही बाजूंनी मराठीचा वापर वाढवण्यासाठी सरकार काही व्यापक उपक्रम राबवणार आहे का? भाषा केवळ कायद्याने वाढत नाही; ती माणसामाणसांच्या व्यवहारातून वाढते. म्हणून हा विषय केवळ चालकांपुरता मर्यादित नाही. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने मराठीशी जोडले गेले पाहिजे आणि मराठीचा वापर वाढला पाहिजे, ही आमची भूमिका आहे. याचा अनुभव आपल्याला रोज येतो. एका अमराठी रिक्षाचालकाने मराठीत, ताई, तुमचे ७० रुपये झाले, हे ३० रुपये परत घ्या, असे म्हटले. त्या महिलेने आनंदाने ते ३० रुपये त्याला भेट म्हणून दिले. हा केवळ भाषेचा विषय नाही; हा महाराष्ट्राशी जोडले जाण्याचा विषय आहे. मराठी शिकल्याने कोणाचे नुकसान होत नाही. उलट, महाराष्ट्राच्या समाजजीवनात मिसळण्याचा तो सर्वांत सोपा मार्ग आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार मराठी भाषा विभाग, मुंबई मराठी साहित्य परिषद आणि कोकण मराठी साहित्य संघ यांच्या सहकार्याने जनजागृती, मार्गदर्शक साहित्य आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून हा उपक्रम व्यापक केला जाईल. ग्रीगेटर धोरणातून ओला–उबरसारख्या कंपन्यांच्या मनमानीला चाप लावण्याचा प्रयत्न झाला आहे. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत झाली आहे? सरकारने ग्रीगेटर धोरण आणले आहे ते कोणत्याही कंपनीला त्रास देण्यासाठी नव्हे, तर चालक आणि प्रवाशांना कंपन्यांच्या मनमानीपासून संरक्षण मिळावे म्हणून. नियम सगळ्यांसाठी समान आहेत. कंपनी कितीही मोठी असो, तिची बाजारातील ताकद कितीही असो, महाराष्ट्राच्या कायद्यापेक्षा मोठे कोणीही नाही. भाडे, परवाना, चालकांचे हक्क, प्रवाशांची सुरक्षा आणि इतर नियमांचे पालन करणे कंपन्यांना बंधनकारक आहे. नियम मोडले तर कारवाई होणारच. कोणाच्याही दबावाखाली परिवहन विभाग काम करणार नाही. व्यवसाय करा; पण नियमांच्या चौकटीत राहून करा.ओला, उबर आणि इतर कंपन्यांच्या भाड्यांमध्ये मोठी तफावत दिसते. सरकारचे याबाबत नेमके धोरण काय असेल?

प्रवाशाला प्रवास सुरू करण्यापूर्वी, किती पैसे द्यावे लागतील, हे स्पष्टपणे माहीत असले पाहिजे. तंत्रज्ञानाच्या नावाखाली प्रवाशांच्या खिशावर डल्ला मारण्याची परवानगी कोणालाही दिली जाणार नाही. त्याचवेळी चालकही महत्त्वाचा घटक आहे. त्याला योग्य मोबदला मिळाला पाहिजे. त्यामुळे आमचे धोरण स्पष्ट आहे – प्रवाशांची लूट नको आणि चालकाचे शोषणही नको. भाड्याबाबत ठरवलेल्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी आणि देखरेख केली जाईल. कंपनीला नफा कमवायचा असेल तर कमवावा; पण नफा कमावताना नियम मोडले, तर सरकार गप्प बसणार नाही. आपण रॅपिडोविरोधात कारवाई केली असली तरी मुंबईसह अनेक ठिकाणी रॅपिडोची दुचाकी सेवा सुरू असल्याचे दिसते. हे कसे? सरकारची भूमिका अगदी स्पष्ट आहे – कायद्याची परवानगी असेल तर व्यवसाय करा; परवानगी नसेल तर व्यवसाय करता येणार नाही. एखादी सेवा कायदेशीर परवानगीशिवाय सुरू असेल, तर संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाईल. त्यासाठी परिवहन विभागासोबत स्थानिक प्रशासन आणि पोलिसांचेही सहकार्य घेतले जाईल. यापूर्वीही रॅपिडोच्या मालकांवर परिवहन विभागाने गुन्हा नोंद केला आहे. मी अधिकाऱ्यांना याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. कायद्याच्या बाहेर जाऊन व्यवसाय करण्याची मुभा कोणालाही नाही. नव्या इलेक्ट्रिक वाहन धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी कुठली पावले टाकणार? इलेक्ट्रिक वाहन धोरण म्हणजे केवळ अनुदान देऊन हात झटकणे नाही. संपूर्ण इलेक्ट्रिक मोबिलिटीची व्यवस्था उभी करावी लागेल.

दैनिक व्याघ्र शौर्यम

हे पत्र मालक, मुद्र , प्रकाशक, संपादक शेख रहीम शेख बाबू यांनी लोकशाही ऑफसेट एम–६९, एमआयडीसी जळगाव येथे छापून इस्लाम पुरा, जामनेर, जळगाव, महाराष्ट्र – ४२४२०६ येथे प्रसिद्ध केले. आर.एन.आय.नं. MHMAR/25/A2382

printed by the owner, printer, publisher, editor Sheikh Rahim Sheikh Babu at Lokshahi Offset M-69, MIDC Jalgaon and published at Islam Pura, Jamner, Jalgaon, Maharashtra - 424206. R.N.I. No. MHMAR/25/A2382

cmyk

# कांद्याचा नेहमीचाच वांधा!

हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेल्याचा इतिहास सर्वश्रुत आहे. तसाच महाराष्ट्राचा कांदा, त्यातही गोदेच्या खोऱ्यातला कांदा, देशाची गरज पडली की उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत मदतीला धावून जातो. परवाच बहुचर्चित कांदा एक्स्प्रेस दिल्लीकडे रवाना झाली. पाठोपाठ रस्तेमार्गानेही शेकडो ट्रक देशभरात पाठवले जात आहेत. मात्र, दुर्दैवाने सरकारांना आपल्या मूलभूत कर्तव्याचा आणि या मदतीच्या परतफेडीचाही विसर पडतो. गरज सरल्यावर शेती उत्पादने आणि उत्पादकांची उपेक्षा होते. विशिष्ट चवीमुळे महाराष्ट्राच्या कांद्याला बाराही महिने मागणी असते. मात्र, पुरवठ्याचे गणित बिघडले की तो दरवाढीच्या रूपाने आपला रागरंग दाखवतो. आता शासन-प्रशासनाच्या चेहऱ्यावरचे रंग उडायला सुरुवात झाली आहे. सणासुदीच्या काळात दूध, साखर आणि कांदा तेजीवर स्वार झाल्याने महागाईच्या आगडोंबात सामान्य ग्राहक भरडला जात असल्याची ओरड होते आहे. एरवी उत्पादक होरपळत असतो, त्याच्या वेदनांकडे लक्ष द्यायलाही कोणाला फुरसत नसते. किरकोळ बाजारात वरील तिन्ही वस्तूंचे दर कमी-अधिक फरकाने साठीच्या पातळीवर पोहोचले आहेत. तरीही पिकवणारा आणि खाणारा दोघेही तोट्यात, असे भलतेच त्रांगडे निर्माण झाले आहे. मधली साखळी मात्र तुपाशी आहे. ही परिस्थिती जाणूनबुजून निर्माण केली जाते, या आरोपातही तथ्य आहे. तूर्तास कांदा एक्स्प्रेसमधील सडलेला कांदा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. ही रेल्वे रवाना होण्यापूर्वीच सरकारी गोदामात मोठ्या प्रमाणावर कांदा सडला होता. त्याची खरेदी नाफेड आणि एनसीसीएफमार्फत झाली होती. रेल्वे धयाला लागल्यानंतर सुस्तावलेल्या व्यवस्थेला ऐनवेळी लोडिंगची आठवण झाली. मजूर आणि ट्रक शोधताना धावाधाव झाली, उशीर झाला. खोळंब्यामुळे वेळ आणि सरकारी पैसा वाया गेला. काही तासांच्या प्रवासानंतर राजधानीत पोहोचेपर्यंत आणखी कांदा नासला. आता ग्राहकाला तो वाजवी दरात मिळत असला, तरी शेवटी उत्पादकाच्या नावाने कंठशोष सुरू आहे. प्रत्यक्षात हा कांदा काही दिवसांपूर्वी मंडईतून, तेही व्यापाऱ्यांकडूनच खरेदी करण्यात आला होता. वखार महामंडळाच्या गोदामांत शास्त्रीय साठवणुकीची व्यवस्था नसल्याने तो सडला. मग उत्पादकाला दोष कसा देता येईल? त्याच्यापुढची आव्हाने आधीच कमी आहेत का?

यंदा अवकाळी पावसाने रोपे खराब झाली. पुढे मान्सूनला उशीर झाल्याने लागवड लांबली. जिथे लागवड झाली, तिथे अतिपावसाने शेतातील उभे पीक आणि शेतकऱ्यांची स्वप्ने खरवडून काढली. दुसरीकडे कांद्याचे थोडेबहुत उत्पादन घेणारे आठ-दहा जिल्हे अद्याप आभाळाकडे नजरा लावून आहेत. या संकटातूनही तरलेल्या कांद्याला जरा बरा दर मिळतो आहे. मात्र, शासनाला जणू तेही सहन होत नसावे. दीर्घकालीन उपाय करण्याऐवजी निर्यातबंदी, आयातीची तयारी, साठेबाजीवर मर्यादा, छापेमारी असे तकलादू सोपस्कार सुरू आहेत. जखम मांडीला आणि मलम शेंडीला असाच सारा मामला. काही महिन्यांपूर्वी दर घसरले तेव्हा नाफेड आणि एनसीसीएफने दोन लाख टन कांदा खरेदीच्या घोषणा केल्या. प्रत्यक्षात जेमतेम सव्वा लाख टन उत्पादनच बाजारातून उचलले गेले. त्यातही भ्रष्टाचाराच्या कथा बाहेर आल्या. शेतकऱ्यांच्या नावाने पावत्या फाडल्या गेल्या; पण लाभ कोणाला झाला, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. आता आडातच नाही, तर पोहऱ्यात कुठून येणार?

नव्या कांद्याची लागवड सुरू असल्याने पुढील तीन महिने ग्राहकांना कळ सोसावीच लागेल. कृषिप्रधान महाराष्ट्रात पिकाला हमीभाव नाही. निर्जलीकरणाची पुरेशी व्यवस्था नाही. मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊनही पाच टक्के साठाही शास्त्रीय पद्धतीने राखता येत नाही. चाळी आणि गोदामांसाठी प्रोत्साहन, अनुदाने, प्रक्रिया उद्योग, निर्जलीकरण प्रकल्प आणि शेतकरी-ग्राहक थेट बाजार व्यवस्था उभी राहिली, तरच मार्ग निघू शकेल; अन्यथा हे चक्र असेच फिरत राहील. शेती आणि शेतकरी टिकला, तरच देश टिकेल, हे वारंवार सांगावे लागणे हीच खरी शोकांतिका.

# धावत्या रेल्वेत दिवा पेटवला; प्रवाशाविरोधात गुन्हा

**भुसावळ ।** धावत्या हजरत निजामुद्दीन-म्हैसूर एक्स्प्रेसच्या आरक्षित बर्थवर दिवा पेटवून पूजा करणाऱ्या प्रवाशाला रेल्वे प्रशासनाने भुसावळ स्थानकावर उतरवले. रेल्वेत खुली ज्योत पेटवण्यास मनाई असतानाही सूचना न पाळल्याने संबंधित प्रवाशाविरोधात रेल्वे अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे आग लागून प्रवाशांच्या जीवितासह रेल्वेच्या मालमत्तेला धोका निर्माण होण्याची शक्यता होती.

दि. ३१ ऑगस्ट रोजी ट्रेन क्रमांक १२७८२ मधील ए-१ कोचच्या बर्थ क्रमांक १७ वर एक प्रवासी दिवा पेटवून पूजा करीत असल्याची माहिती भुसावळच्या वाणिज्यिक नियंत्रण कक्षाला मिळाली. ड्युटीवरील तिकीट तपासणी कर्मचारी रमन कुमार शर्मा (खंडवा) यांनी ही बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर संबंधित टीटीईने प्रवाशाला दिवा तातडीने विझवण्याची सूचना केली. रेल्वेत खुली ज्योत वापरणे धोकादायक असून त्यातून आग लागण्याची शक्यता असल्याचेही त्याला समजावून सांगण्यात आले मात्र प्रार्थना पूर्ण झाल्यानंतरच दिवा विझवणार असे सांगत प्रवाशाने सूचना पाळण्यास नकार दिला. टीटीईने या प्रकाराचे मोबाईलवर चित्रीकरण करून पुरावा जतन केला. भुसावळ स्थानकावर प्रवाशाला उतरवलेघटनेची गंभीरता लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने संबंधित प्रवाशाला भुसावळ स्थानकावर ट्रेनमधून उतरवले. चौकशीत हा प्रवासी मध्यप्रदेशातील ग्वाल्हेरचा ५५ वर्षीय रहिवासी असल्याचे समोर आले.

# नेपाळ हाहाकार : मृतांचा आकडा १,०६६ वर!

## अजूनही ४,४६२ जण बेपत्ता : बचाव कार्याने घेतला वेग

**काठमांडू ।** हिमालयीन भागात आलेल्या भीषण पुरानंतर नेपाळ आणि तिबेटमध्ये परिस्थिती अद्याप गंभीर आहे. मंगळवारी उपलब्ध आकडेवारीनुसार, या महापुरातील मृतांचा आकडा १,०६६ वर पोहोचला असून ४,४६२ जण अद्याप बेपत्ता आहेत. बचावकार्याला सात दिवस पूर्ण झाले असून, खुल्या भागात अडकलेल्या नागरिकांना जिवंत शोधण्याची शक्यता अत्यंत कमी झाली आहे.

मृतांमध्ये नेपाळमधील १,०५० तर तिबेटमधील १६ जणांचा समावेश आहे. नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम कमीकरण आणि व्यवस्थापन प्राधिकरणानुसार ३,९१६ जण बेपत्ता असून त्यात ५८३ परदेशी नागरिकांचा समावेश आहे. चीनच्या ताज्या आकडेवारीनुसार तिबेटमध्ये आणखी ५४६ जण बेपत्ता आहेत. भोटे कोशी-त्रिशूली नदीच्या परिसरात बचाव पथकांकडून चिखल, मोठमोठे दगड, उन्मळून पडलेली झाडे आणि ढिगाऱ्यांमध्ये शोधमोहीम सुरू आहे. मात्र पुराच्या प्रचंड वेगाने नदीकाठावरील वस्त्या आणि वनस्पतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, अनेक भागात जाड चिखल आणि दगडांचे थर साचले आहेत. नेपाळ पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मते, सुरुंग, भूमिगत वीज प्रकल्प आणि इतर सुरक्षित ठिकाणे वगळता खुल्या भागात सात दिवसांनंतर कोणी जिवंत सापडणे हा चमत्कारच ठरेल. मात्र शोधमोहीम अद्याप थांबवण्यात आलेली नाही. नेपाळ लष्कराच्या बचाव पथकांनी श्वान पथकांच्या मदतीने मोठ्या परिसरात शोध घेतला आहे. मात्र पुराच्या थेट तडाख्यामुळे खुल्या भागात अडकलेल्या व्यक्तींच्या बचावाची शक्यता अत्यंत कमी असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

बचाव पथकांच्या आशा आता प्रामुख्याने नेपाळमधील उद्ध्वस्त जलविद्युत प्रकल्पांच्या भूमिगत बोगद्यांवर केंद्रित आहेत. आकडेवारीनुसार जलविद्युत प्रकल्पांशी संबंधित ६३९ जण बेपत्ता आहेत. पूर आला त्यावेळी सुमारे ५०० जण बोगद्यांमध्ये असण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# उमवि कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## अकरा टक्के लाभांश, कर्ज मर्यादा वाढ, सौर उर्जा कर्ज सहीत अनेक महत्वाचे निर्णय

**जळगाव :** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचाऱ्यांची सहकारी पतपेढी मर्या., जळगावची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी विद्यापीठ अधिसभागृहात अध्यक्ष श्री. अरुण सपकाळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीस आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील पतपेढीच्या वार्षिक कामकाजाचा अहवाल व वार्षिक आर्थिक पत्रकास सभेने मान्यता दिली. तसेच आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी



देण्यात आली.

याप्रसंगी सभासद हिताचे अनेक निर्णय घेण्यात आले. त्यात विशेष कर्जाची मर्यादा एक लाख रुपयांनी वाढविण्यात येऊन ती साडे आठ लाख करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे दरमहा भरल्या जाणाऱ्या वर्गणी रकमेत स्वेच्छेने वाढ करता येणार आहे. त्याचप्रमाणे या वर्षी लाभांश ११ टक्के देण्यात येणार आहे. पतपेढीच्या विविध आर्थिक व प्रशासकीय विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. सौर पॅनल बसविण्याबाबत तसेच पतपेढीच्या इमारतीच्या दुरुस्तीबाबतही चर्चा करण्यात आली.

सभेच्या निमित्ताने कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. योगेश पाटील, यांच्या शुभहस्ते गुणवंत पाल्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तसेच पतपेढीचे सलग २५ वर्षे सदस्य राहिलेल्या ज्येष्ठ सदस्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यानंतर पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

पतपेढी सभासदांनी संचालक मंडळास विचारलेल्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तरे देण्यात आल्याने बैठक शांततेत पार पडली. सभेस पतपेढीचे अध्यक्ष श्री. अरुण सपकाळे, उपाध्यक्ष श्री. संजय ठाकरे, सचिव डॉ. अनिल लोहार, तसेच संचालक मंडळातील डॉ. महेंद्र महाजन, श्री. राजू सोनवणे, डॉ. सोमनाथ वडनेरे, सौ. जयश्री देशमुख, श्री. दीपक गावीत, श्री. विकास बिऱ्हाडे आदी उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. सोमनाथ वडनेरे यांनी केले. सभासदांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे वार्षिक सर्वसाधारण सभा यशस्वीरीत्या संपन्न झाली.

# सिलिंडर बुकिंगच्या कटकटीतून जळगावकरांची सुटका!

## जिल्ह्यात प्रथमच थेट घराघरांत पाईप गॅस : जळगावातून होणार सुरुवात

**जळगाव ।** घरातील गॅस सिलिंडर संपण्यापूर्वी बुकिंग करणे, त्यानंतर डिलिव्हरीची प्रतीक्षा करणे, सिलिंडरच्या वजनाचा आणि महिन्याच्या वापराचा हिशोब ठेवणे या दैनंदिन कटकटीतून आता जळगावकरांची कायमची सुटका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जिल्ह्यात प्रथमच घरगुती स्वयंपाकासाठी थेट पाईपलाईनद्वारे नैसर्गिक गॅस (पाईप गॅस) पोहोचविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने हाती घेतला आहे. नळाला जसे पाणी येते, त्याच पद्धतीने भविष्यात थेट स्वयंपाकघरातील शेगडीपर्यंत गॅस पोहोचणार असून, ग्राहकांकडून प्रत्यक्ष वापरानुसार मीटरच्या आधारे बिल आकारले जाणार आहे.

या प्रकल्पाच्या पूर्वतयारीसंदर्भात नुकतीच जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या दालनात बैठक झाली. यावेळी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे सीनियर मॅनेजर योगेश लोखंडे, मॅनेजर मनीषकुमार गौतम यांनी प्रकल्पाचा सविस्तर आराखडा जिल्हा प्रशासनासमोर मांडला. पहिल्या टप्प्यात जळगाव शहरात पाईपलाईनचे जाळे विणण्यात येणार असून, त्यानंतर भुसावळ आणि चाळीसगाव शहरात प्रकल्पाचा विस्तार केला जाणार आहे. सध्या घरगुती गॅस सिलिंडरचा साठा संपण्यापूर्वी ग्राहकांना बुकिंग करावे लागते. बुकिंगनंतर सिलिंडर घरपोच मिळेपर्यंत प्रतीक्षा करावी लागते. अनेकदा सिलिंडर संपल्याने स्वयंपाकाचा खोळंबा होतो किंवा पर्यायी व्यवस्था करावी लागते. नव्या पाईप गॅस व्यवस्थेमुळे या सर्व



समस्यांना पूर्णविराम मिळणार आहे. नवीन व्यवस्थेत घराबाहेर गॅसचे मीटर बसविण्यात येईल. या मीटरद्वारे महिन्याभरात ग्राहकाने किती गॅस वापरला, याची नोंद होईल. त्यानुसार प्रत्यक्ष वापराचे बिल ग्राहकाला भरावे लागणार आहे. त्यामुळे सिलिंडरची संख्या, वजन, बुकिंगची तारीख किंवा डिलिव्हरीची प्रतीक्षा यांचा त्रास ग्राहकांना राहणार नाही.

प्रकल्पाच्या प्राथमिक टप्प्यात जळगाव शहरातील प्रमुख रस्ते तसेच मोठ्या वसाहतींमध्ये मुख्य पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. त्यानंतर संबंधित भागातील घरांना स्वतंत्र घरगुती जोडण्या देण्याचे नियोजन आहे. पाईपलाईन टाकण्यासाठी आवश्यक जागा आणि तांत्रिक बाबींची पाहणी करून कामाची आखणी केली जाणार आहे. शहरातील काही दाटीवाटीच्या भागांमध्ये पाईपलाईन टाकण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसण्याची शक्यता आहे. अशा भागांची स्वतंत्र तांत्रिक पाहणी करून पर्यायी मार्गांचा शोध घेतला जाणार आहे. त्यामुळे शहरातील जास्तीत जास्त भाग पाईप गॅसच्या जाळ्याशी जोडण्याचे कंपनीचे नियोजन आहे.

**भादली येथून होणार मुख्य गॅस पुरवठा**

पाईपलाईन प्रकल्पासाठी मुख्य गॅस सप्लाय भादली येथून होणार असल्याची माहिती कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिली. शहरात स्वतंत्र कार्यालयाची व्यवस्था करण्यात येणार असून, या कार्यालयातून संपूर्ण पाईपलाईन नेटवर्कवर देखरेख ठेवली जाणार आहे. तसेच तांत्रिक अडचणी, गळती किंवा दुरुस्तीची आवश्यकता निर्माण झाल्यास त्यावर तत्काळ कार्यवाही करण्याची जबाबदारीही संबंधित यंत्रणेची राहणार आहे. पहिल्या टप्प्यात जळगाव शहरात प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यानंतर भुसावळ आणि चाळीसगाव या शहरांमध्ये पाईप गॅसचे जाळे विस्तारण्यात येईल. पुढील काळात जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही या सुविधेचा विस्तार करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे भविष्यात जिल्ह्यातील मोठ्या लोकसंख्येला सिलिंडरऐवजी पाईपद्वारे घरगुती गॅस उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

**स्थानिक तरुणांना रोजगाराची संधी**

प्रकल्पाचा विस्तार जळगाव शहरापुरता मर्यादित न राहता भुसावळ, चाळीसगाव आणि इतर तालुक्यांमध्ये झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. ही गरज स्थानिक पातळीवर पूर्ण करण्यासाठी आयटीआयच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याचा कंपनीचा मानस आहे. प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रकल्पाच्या विविध कामांमध्ये बीओटी तत्त्वावर कामाची संधी उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे कंपनी व्यवस्थापनाने स्पष्ट केले. पाईपलाईन टाकणे, जोडण्या देणे, देखभाल-दुरुस्ती तसेच तांत्रिक कामांसाठी स्थानिक कुशल मनुष्यबळ तयार होणार आहे. त्यामुळे पाईप गॅस प्रकल्पामुळे केवळ घरगुती इंधनाची सुविधा उपलब्ध होणार नसून जिल्ह्यातील तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या तरुणांसाठी रोजगाराचे नवे दालनही खुले होण्याची अपेक्षा आहे.

**गृहिणींचा त्रास कमी होणार!**

गॅस सिलिंडर संपण्यापूर्वी बुकिंग करणे, सिलिंडर घरापर्यंत पोहोचण्याची वाट पाहणे आणि सिलिंडर संपल्यास पर्यायी इंधनाची व्यवस्था करणे, या सर्व प्रक्रियेत सर्वाधिक त्रास गृहिणींना सहन करावा लागतो. पाईप गॅसची सुविधा सुरू झाल्यानंतर स्वयंपाकघरात थेट गॅस उपलब्ध होणार असल्याने या दैनंदिन त्रासातून मोठी सुटका होण्याची अपेक्षा आहे. पाईप गॅस व्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्राहकांना प्रत्यक्ष वापरानुसार बिल आकारले जाणार आहे. घराबाहेर बसविण्यात येणाऱ्या मीटरमधील नोंदीनुसार महिन्याचा वापर निश्चित होईल आणि त्याच आधारावर बिलाची रक्कम ठरेल. त्यामुळे सिलिंडरप्रमाणे एकावेळी ठरावीक प्रमाणात गॅस घेण्याऐवजी ग्राहकाला वापरानुसार देयक भरता येणार आहे.

# बॅनर्जींच्या भाचीचा मृतदेह आढळला!

**बीरभूम** प्रतिनिधी

पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांच्या कुटुंबातील ३१ वर्षीय महिलेचा मृतदेह मंगळवारी बीरभूम जिल्ह्यातील तिच्या राहत्या घरी आढळून आला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिला ममता बॅनर्जी यांच्या मातृकडील नातेवाईकाच्या मुलगी होती. तिचे वडील बीरभूममधील कुसुंबा गावातील स्थानिक तृणमूल काँग्रेसचे नेते होते. रामपूरहाट पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. मंगळवारी दुपारच्या सुमारास कुटुंबीयांनी घराच्या दुसऱ्या मजल्यावर तिचा मृतदेह पाहिला. घटनेची माहिती मिळताच रामपूरहाट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासादरम्यान तिच्याकडून कोणतीही चिठ्ठी किंवा सुसाइड नोट आढळलेली नाही. रामपूरहाट पोलीस ठाण्याचे निरीक्षक शांतनु अधिकारी यांनी सांगितले की, कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, संबंधित महिला गेल्या काही वर्षांपासून गंभीर नैराश्याचा सामना करत होती. तिच्यावर मानसोपचार तज्ज्ञांकडून उपचार सुरू होते आणि ती नियमित औषधे घेत होती. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, तिचे २०१२ मध्ये लग्न झाले होते. सध्या तिच्या घटस्फोटाचे प्रकरण सुरू होते. या प्रकरणामुळे ती तणावाखाली असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# जिल्ह्यात महात्मा फुले महसूल लोक अदालत

**जळगाव** प्रतिनिधी

महसूल विभागातील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे परस्पर संमती व तडजोडीने जलदगतीने निकाली काढण्यासाठी दि. १ सप्टेंबर ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान राबविण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार जळगाव जिल्ह्यात या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रथम महसूल लोक अदालत दि. १७ सप्टेंबर व द्वितीय महसूल लोक अदालत दि. ६ जानेवारी २०२७ रोजी महसूल लोक अदालती आयोजित करण्यात येणार आहेत. या अभियानात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी यांच्या स्तरावरील अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या विविध प्रकारच्या महसुली दावे व अपिलांचा समावेश करण्यात येणार आहे.

तसेच जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांच्या स्तरावरील प्रकरणांचाही समावेश राहणार आहे. संबंधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी उपविभाग स्तरावर, तहसीलदार व नायब तहसीलदार तहसील कार्यालय स्तरावर आणि मंडळ अधिकारी मंडळ स्तरावर लोकअदालतीचे आयोजन करतील. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर महसूल लोकअदालत आयोजित करण्यात येईल.

# राहुल गांधी गो बॅक.. भाजप महिला पदाधिकाऱ्यांची घोषणाबाजी

**नशिक** प्रतिनिधी

पुण्यातील छात्रों की गूंज कार्यक्रमानंतर काँग्रेसचे नेते, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे बुधवारी नाशिकच्या दौऱ्यावर आहेत. संघटन सृजन अभियानांतर्गत निवड झालेल्या राज्यातील काँग्रेसच्या ७८ नवनियुक्त जिल्हाध्यक्षांशी ते नाशिक येथील प्रशिक्षण शिबिरात संवाद साधणार आहेत. यावेळी जागतिक राजकारण आणि भारत या विषयावर त्यांचे भाषण होणार आहे. राहुल गांधी यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर गंगापूर धरण परिसरातील कार्यक्रमस्थळाला पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. धरणाकडे जाणारा रस्ता लोखंडी जाळ्या अर्थात बॅरिकेडिंगने बंद करण्यात आला आहे.

दरम्यान राहुल गांधी नाशिकमध्ये दाखल झाल्यानंतर भाजपच्या महिला पदाधिकाऱ्यांकडून राहुल गांधी, गो बॅकचे नारे देण्यात आलेत. यावेळी नारी शक्ती वंदन विधेयकाला विरोध करणाऱ्या राहुल गांधी आणि काँग्रेसचा निषेध असो, नारीशक्तीचा विजय असो राहुल गांधी, गो बॅक अशा स्वरुपाचे फलक हातात घेऊन भाजपच्या महिला पदाधिकाऱ्यांकडून जोरदार घोषणाबाजी सुरु होती. यावेळी आमदार देवयानी फरांदे, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर आडके, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्यासह अनेक महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्र सरकारच्या नारी शक्ती वंदन विधेयकाला (महिला आरक्षण विधेयक) विरोध केल्याचा आरोप करत नाशिक भाजपच्या महिला पदाधिकारी आणि नगरसेवकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. राहुल गांधी यांच्या दौऱ्याचा निषेध नोंदवण्यासाठी भाजपच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर हे निषेध आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनादरम्यान भाजपच्या महिला कार्यकर्त्या आणि प्रमुख पदाधिकारी यांनी काळे कपडे परिधान करून तसेच हाताला काळ्या फिती लावून निषेध व्यक्त करत आहेत. काँग्रेसने महिला आरक्षणाला विरोध करून महिलांच्या अधिकारांवर गदा आणली आहे, असा आरोप करत भाजप नेत्यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

# नियमित स्वच्छताचा दावा फोल? रावेरमध्ये बातमी प्रसिद्ध होऊनही घाणीचे साम्राज्य कायम!

## नगरपरिषद म्हणते घंटागाडी घराघरात; नागरिकांचा दावा–आठवड्यातून एकदा येते, मग रोजचा कचरा टाकायचा कुठे?

**रावेर | शेख शरीफ**

रावेर शहरातील अस्वच्छतेचा प्रश्न दैनिक व्याघ्र शौर्यमने ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केलेल्या वृत्तातून प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. कौसर मस्जिद ते ईदगाह रोड परिसरातील कचऱ्याचे ढीग, तुंबलेल्या गटारी आणि दुर्गंधीची समस्या मांडल्यानंतर नगरपरिषद प्रशासनाने याची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे सांगितले. मात्र, संबंधित परिसरातील परिस्थिती अद्यापही जैसे थे असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

नगरपरिषद प्रशासनाकडून शहरात घंटागाडी व कचरा संकलन वाहनांद्वारे घराघरातून नियमित कचरा संकलित केला जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार घंटागाडी दररोज येत नसून आठवड्यातून एकदाच येते. त्यामुळे दररोज निर्माण होणारा घरगुती कचरा नागरिकांनी ठेवायचा कुठे, असा सवाल उपस्थित होत आहे.

**नियमित साफसफाई मग कचऱ्याचे ढीग का?**

संबंधित परिसराची पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे प्रशासनाने स्पष्ट केले होते. मात्र, प्रत्यक्षात कचऱ्याचे ढीग हटले आ-हेत का, गटारींची साफसफाई झाली का आणि पुन्हा कचरा साचू नये यासाठी काय उपाययोजना करण्यात आल्या, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. नगरपरिषदेकडून काही नागरिक सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकत असल्याचे सांगण्यात आले आहे. नागरिकांनी कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकू नये, ही जबाबदारी मान्य असली तरी कचरा संकलनाची नियमित आणि सक्षम व्यवस्था उपलब्ध करून देणे ही प्रशासनाचीही जबाबदारी आहे, अशी



नागरिकांची भूमिका आहे.

**हॉटस्पॉट निश्चित झाले; कारवाई कुठे?**

कचरा टाकण्याचे हॉटस्पॉट निश्चित करून तेथे नियमित स्वच्छता, जनजागृती आणि आवश्यकतेनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने सांगितले आहे. मात्र, हॉटस्पॉट निश्चित केले असतील तर तेथे किती वेळा स्वच्छता करण्यात आली, किती जनजागृती झाली आणि नियमभंग करणाऱ्यांवर किती कारवाई झाली, याची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी होत आहे.

**माझा कचरा–माझी जबाबदारीसोबत पालिकेची जबाबदारीही हवी**

नागरिकांनी माझा कचरा–माझी जबाबदारी या भावनेतून सहकार्य करावे, असे आ-वाहन प्रशासनाने केले आहे. मात्र, त्याचबरोबर नियमित घंटागाडी, पुरे-शा कचराकुंड्या, तुंबलेल्या गटारींची साफसफाई आणि जमा कचऱ्याची तातडीने विल्हेवाट यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. दैनिक व्याघ्र शौर्यमच्या वृत्ताची दखल घेतल्याचे प्रशासन सांगत असले तरी केवळ प्रतिक्रिया नव्हे, तर प्रत्यक्ष स्वच्छता दिसणे अपेक्षित आहे, अशी नागरिकांची मागणी आहे. एकीकडे स्वच्छ रावेरचे संदेश दिले जात असताना दुसरीकडे रस्त्यांवर कचरा व तुंबलेल्या गटारींचे चित्र कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

**नगरपरिषद म्हणते नियमित स्वच्छता होते; नागरिक म्हणतात परिस्थिती जैसे थे–मग खरे कोण?**

आता उत्तर कागदावर किंवा प्रतिक्रियेत नव्हे, तर रावेरच्या रस्त्यांवर दिसायला हवे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. कचऱ्याचे ढीग हटणार कधी, तुंबलेल्या गटारी वाहणार कधी, घंटागाडी नियमित फिरणार कधी आणि स्वच्छ रावेरचा दावा प्रत्यक्षात उतरणार कधी, याकडे रावेरकरांचे लक्ष लागले आहे.

# सोशल मीडियाचा वापर रचनात्मक कामासाठी करा : श्रीकांत धिवरे

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रावेर येथे शांतता समितीची बैठक





**रावेर :** सोशल मीडियावर पोलीस प्रशासनाचे लक्ष असून, नागरिकांनी सोशल मीडियाचा वापर योग्य व रचनात्मक कामासाठी करावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी केले.

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रावेर येथील मराठा मंगल कार्यालयात रावेर पोलीस ठाण्याच्या वतीने शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.

धिवरे म्हणाले की, गणेश मंडळांनी उत्सवादरम्यान विविध रचनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करावे. उत्सवाला कोणत्याही प्रकारे गालबोट लागणार नाही, याची दक्षता घ्यावी. सण-उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी शांतता समितीचे सदस्य आणि नागरिकांनी सतर्क राहून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे. आगामी गणेशोत्सव शांततेत व उत्साहात साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी नायब तहसीलदार साळी, वीज वितरणचे निरंजन कोष्टी, मुख्याधिकारी अविनाश गांगोडे, गटविकास अधिकारी विनोद मेढे, माजी नगराध्यक्ष पद्माकर महाजन, डॉ. संदीप पाटील, माजी नगरसेवक अब्दुल मुतल्लिब, अरुण शिंदे, अशोक शिंदे, दिलीप कांबळे, अयुब खान रसलपूर, शेख शफीउद्दिन, बाळू शिरतुरे आदींनी मनोगत व्यक्त केले.

बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर, माजी नगराध्यक्ष हरीश गनवाणी, नगरसेवक राजेश शिंदे, डॉ. सुरेश पाटील, भास्कर महाजन, नितीन पाटील, शैलेंद्र अग्रवाल, सफदर खान यांच्यासह शांतता समितीचे सदस्य व विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी केले.

# कोळसा चोरी प्रकरणी सहा जणांविरोधात गुन्हा

**भुसावळ** ✍ प्रतिनिधी

दीपनगर केंद्र परिसरातील रेल्वे सायडींग, रेल्वे ओव्हर ब्रिजजवळ मंगळवार, १ रोजी सकाळी सात वाजेच्या सुमारास सहा संशयीतांनी सुमारे २० हजार रुपये किंमतीचा पाच टन चोरल्याचा प्रकार सुरक्षा रक्षकांच्या लक्षात आल्याने भुसावळ तालुका पोलिसात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. संशयीतांचा पोलिसांकडून शोध सुरू करण्यात आला आहे.

सुरक्षा अधिकारी सोमेश्वर मधुकर जाधव (२९, खडका, ता.सोनपीठ, ह.मु.दीपनगर वसाहत) यांच्या फिर्यादीनुसार,



मंगळवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास दीपनगर औष्णिक विद्युत केंद्र परिसरातील रेल्वे सायडींग, ओव्हर ब्रिजजवळ कोळसा चोरी होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी धाव घेतल्यानंतर संशयीतांनी २० हजार रुपये किंमतीचा कोळसा लांबवला. तपास परिवेक्षाधीन पोलीस उपअधीक्षक प्रशांत दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नाईक हेमंत मिटकरी करीत आहेत.

# विवरे येथे सरस्वती स्कूलमध्ये पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती स्पर्धा उत्साहात

## शाडू मातीपासून विद्यार्थ्यांनी साकारल्या आकर्षक गणेशमूर्ती; पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**विवरे, ता. रावेर | जमील शेख**

येथील सरस्वती शैक्षणिक व सांस्कृतिक विकास मंडळ संचलित सरस्वती इंग्लिश मीडियम स्कूल, विवरे खुर्द येथे विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे प्रशासक महेंद्र दयाराम पाटील व सहप्रशासक संगीता महेंद्र पाटील यांच्या हस्ते गणेशमूर्ती निर्मितीसाठी आवश्यक पाटाचे पूजन करून उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शिक्षिका योगिता चौधरी यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले.

शिक्षिकेच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा, सर्जनशीलतेचा व कलाकौशल्याचा वापर करून विविध आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आपल्या कलागुणांना वाव दिला.

या उपक्रमाचा उद्देश केवळ गणेशमूर्ती तयार करणे नसून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे हा होता. शाडू मातीच्या मूत-ींचा वापर, प्रदूषण टाळणे आणि पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी संवेदनशीलता, सर्जनशीलता, हस्तकौशल्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होण्यास मदत झाली. भक्तीबरोबरच निसर्गाचे रक्षण करण्याची शिकवण देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

# यावल तालुक्यात ४८ ग्रामपंचायतींचा कारभार ऐरणीवर

## प्रशासकांची मुदत ३१ ऑगस्टला संपली; ग्रामपंचायतींची सूत्रे आता कोणाच्या हाती?



**यावल** : यावल तालुक्यातील तब्बल ४८ ग्रामपंचायतींच्या प्रशासकांची मुदत ३१ ऑगस्ट रोजी संपल्याने ग्रामपंचायतींच्या पुढील कारभाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासकांची मुदत संपल्यानंतर आता या ग्रामपंचायतींचा दैनंदिन कारभार कोणाच्या माध्यमातून चालविला जाणार, याबाबत ग्रामस्थांमध्ये संभ्रम आहे. शासनाच्या पुढील आदेशाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तालुक्यातील ४८ ग्रामपंचायतींच्या निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांची मुदत सुमारे सहा महिन्यांपूर्वी संपली होती. त्यानंतर शासनाच्या निर्दे शानुसार संबंधित ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली होती. प्रशासकांच्या माध्यमातून दैनंदिन प्रशासकीय कामकाज, शासकीय योजना आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित कामे सुरू होती. मात्र, ३१ ऑगस्ट रोजी प्रशासकांची मुदतही संपल्याने ग्रामपंचायतींची पुढील प्रशासकीय व्यवस्था काय असणार, हा प्रश्न निर्माण झाला आहे. निवडून आलेले सरपंच व सदस्य नसताना प्रशासकांची मुदत संपल्याने गावपातळीवरील प्रशासनाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

**ग्रामविस्तार अधिकाऱ्यांकडे कारभार जाणार?**

प्रशासकांची मुदत संपल्यानंतर काही ग्रामपंचायतींचा कारभार ग्रामविस्तार अधिकारी अथवा संबंधित अधिकाऱ्यांकडे सोपविला जाणार असल्याची चर्चा आहे. मात्र, याबाबत अधिकृत आदेश स्पष्ट होणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत राहण्यासाठी शासनाने तातडीने प्रशासकीय व्यवस्था निश्चित करावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. जन्म-मृत्यू नोंदणी, विविध दाखले, पाणीपुरवठा, स्वच्छता, कर वसुली आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी यांसारख्या दैनंदिन कामांवर परिणाम होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**निवडणुका लांबणीवर; विकासकामांवर परिणाम?**

ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने स्थानिक पातळीवरील विकासकामांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. रस्ते, गटारी, पाणीपुरवठा, स्ट्रीट लाईट, स्वच्छता आणि अन्य सार्वजनिक सुविधांशी संबंधित कामांसाठी ग्रामपंचायतीची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे प्रशासकीय व्यवस्था स्पष्ट नसल्यास नवीन विकासकामे व प्रस्तावांच्या पाठपुराव्याला विलंब होण्याची भीती आहे.

**शासनाच्या निर्णयाकडे लक्ष**

४८ ग्रामपंचायतींच्या प्रशासकांची मुदत संपल्यानंतर आता ग्रामपंचायतींची सूत्रे कोणाच्या हाती जाणार, याबाबत ग्रामस्थ, कर्मचारी आणि नागरिकांमध्ये उत्सुकता आहे. शासनाने तातडीने स्पष्ट आदेश काढून ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत ठेवण्यासाठी योग्य प्रशासकीय व्यवस्था करावी, तसेच ग्रामपंचायत निवडणुकांबाबतही स्पष्टता द्यावी, अशी मागणी होत आहे.

## खेडगाव बिटमध्ये 'वेलकम मेळावा' उत्साहात संपन्न

**खेडगाव** ✍ प्रतिनिधी



एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, चाळीसगाव-१ अंतर्गत खेडगाव बिटमध्ये 'वेलकम मेळाव्याचे' आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या मेळाव्यास अंगणवाडीतील बालके, पालक, गर्भवती व स्तनदा माता तसेच विविध योजनांचे लाभार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या माध्यमातून अंगणवाडी केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना, बालकांचे पोषण व आरोग्य, पूर्व प्राथमिक शिक्षण, नियमित आरोग्य तपासणी तसेच गर्भवती व स्तनदा मातांसाठी उपलब्ध योजनांची माहिती उपस्थित लाभार्थींना देण्यात आली. शासनाच्या विविध योजनांचा पात्र लाभार्थींनी लाभ घ्यावा तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अंगणवाडीशी नियमित संपर्क ठेवावा, असे आवाहन करण्यात आले. बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती साधना कापडणी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली मेळावा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन पर्यवेक्षिका श्रीमती वहिदा तडवी यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगणवाडी सेविका मनिषा साळुंखे यांनी केले. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी यमुनाबाई जाधव,आशा साळुंखे, स्वाती महाजन, सुनिता माळी, वैशाली साळुंखे, निर्मला साळुंखे तसेच सर्व मदतनीस ताईंनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी पर्यवेक्षिका श्रीमती वहिदा तडवी यांनी उपस्थित मान्यवर, लाभार्थी, पालक, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे आभार व्यक्त केले. उपस्थित लाभार्थी व पालकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## बोदवड आरक्षण विरोधी एल्गार मोर्चाने दणाणले

**बोदवड।** ✍ प्रतिनिधी



येथे अनुसूचित जाती उपवर्गीकरणाच्या विरोधात सर्व आंबेडकरी पक्षाच्या वतीने एल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.मोर्चाची सुरुवात कृषी उत्पन्न बाजार समिती येथून करण्यात आली.मलकापूर चौफुली शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस , डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व महात्मा फुले यांच्या चौकातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्प हार अर्पण करून बोदवड तहसील कार्यालयावर सरकारच्या विरोधी घोषण देऊन परिसर दणाणला

राजाभाऊ सूर्यवंशी रिपाइं अध्यक्ष यांनी महायुती सरकार समजा हे फडणवीस सरकार समजा समाजात फूट पडण्याचे काम करीत आहे.मातंग बांधवांनी सुद्धा या आमिषाला बळी पडू नये.आपल्या मुलांना फक्त लहुजी वस्ताद दांड पट्ट्या पुरता व अण्णा भाऊ साठे हे दीड दिवस शाळेत गेले एवढेच शिकवू नये. मातंग बांधवांनी मनुवादी मानसिकतेचे गुलाम बनू नये.आम्ही आता पर्यंत अन्याय अत्याचार प्रसंगी मातंग बांधव यांना सहकार्य केले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्वीकारावे. राजाभाऊ सूर्यवंशी यांनी बोदवड येथीलडॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक पूर्ण करण्याचे आश्वासन आमदार चंद्रकात पाटील यांनी पाळले नाही.

त्याची बौद्ध समाजाची फसवणूक करून आंबेडकरी तरुणांची दिशा भूल केली आहे. असे या प्रसंगी आठवण करून दिली. आरक्षणाचे तुकडे करणाऱ्या आणि सामाजिक ऐक्याला बाधा आणणाऱ्या अनुसूचित जाती उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात सर्व वक्त्यांनी महायुती सरकार वर हल्ला चढविला. हक्क आणि अधिकारांचे रक्षण करण्यासाठी सर्व आंबेडकरी विचाराचे पक्ष ,सामाजिक संघटना,सर्व समाज बांधव मोर्चात सहभागी झाले होते.या एल्गार मोर्चाला राजाभाऊ सूर्यवंशी रिपाइं जिल्हा अध्यक्ष, बाळा भाऊ पवार, युवा अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी , जनसेवक विनोद पारड ,सिद्धार्थ सुरळ कर,राजाभाऊ थाटे.आंबेडकरी बाटलियन चे अभिमान निकम यांनी मोर्चाला संबोधित केले.मोर्चाचे निवेदन स्वीकारण्यासाठी तहसीलदार ध्यानेश्वर सपकाळे यांनी निवेदन स्वीकारले.

## बारकोड असलेल्या जन्म - मृत्यू दाखल्याच्या नोंदी तात्काळ मिळाव्या

### जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना फैजपूर उपनगराध्यक्षांची निवेदनाद्वारे मागणी

**फैजपूर।** ✍ प्रतिनिधी

नगर परिषदेच्या आरोग्य विभाग अंतर्गत देण्यात येत असलेल्या जन्म व मृत्यू दाखल्याच्या ऑनलाईन प्रणालीच्या (बारकोड असलेल्या) नोंदी गेल्या कित्येक दिवसांपासून प्रलंबित असल्यामुळे नागरिकांना याबाबत मोठा त्रास सहन करावा लागत आहे

यामागील मुख्य कारण असे की (बारकोड) ऑनलाईन प्रणालीच्या जन्म मृत्यूच्या नोंदी या जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद जळगाव यांची ऑनलाईन मंजुरी मिळाल्यानंतर फैजपुर नगर परिषदेत हे दाखले वितरित करण्यात येतात परंतु गेल्या चार महिन्यापासून नगरपरिषदेत जवळपास २५० च्यावर दाखले वितरण प्रलंबित असल्यामुळे या विषया संदर्भात दिनांक १सप्टेंबर रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी यांची फैजपुर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विनोद( पप्पू) चौधरी यांनी भेट घेऊन या संदर्भात निवेदन सादर करून या प्रणालीद्वारे येत असलेल्या त्रुटी व याबद्दल होणारी नागरिकांची हेळसांड या विषयं संबंधित अधिकाऱ्यांच्या सदरील अडचणी निर्दशनास आणून तात्काळ यावरती जलद कार्यवाही करून या मंजुरी त्वरित मिळाव्या याबाबत निवेदन सादर केले

सदरील निवेदनात १)संबंधित नोंदी तात्काळ मंजूर होऊन मिळाव्या २) एक लॉगीन न देता विविध लॉगिन आयडी मिळाल्यास एकाच वेळी जास्त दाखले वितरित करता येतील ३) किंवा नोंदी मंजुरीचे अधिकार पूर्वीप्रमाणे नगरपरिषदेला प्रधान करण्यात यावे या मुख्य अटी सदरील निवेदनात नमूद करून या सोडविण्याची विनंती यावेळी करण्यात आली यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन एक संपूर्ण दिवस या विषयासाठी देऊन संपूर्ण एका दिवसात या सर्व नोंदी क्लियर करून देण्याचे आश्वासन यावेळी दिले.



सदरील निवेदन स्वीकारताना जिल्हा आरोग्य अधिकारी सचिन भाएकर, आरोग्य विभागाचे अधिकारी श्री किरण पराशर, श्री मनचरे साहेब व इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते.

या निवेदनाची प्रत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगाव यांना सुद्धा देण्यात आलेली आहे.

याबाबत फैजपूर च्या नगराध्यक्ष सौ दामिनी पवन सराफ यांनी सुद्धा संबंधित विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला असल्याचे यावेळी कळविण्यात आले.

## चैतन्यत्या विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्ती शपथ

**जळगाव ।** ✍ प्रतिनिधी

चैतन्य आयुर्वेद महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विशेष व्यसनमुक्ती मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहण्याची तसेच समाजाला व्यसनमुक्त करण्यासाठी योगदान देण्याची शपथ घेतली. जिल्हा परिषदेचे सहायक अधिकारी तसलीमखा तडवी यांनी निरोगी, आनंदी जीवन जगण्याचे आवाहन केले. तर चेतना व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. नितीन विसपुते यांनी व्यसनाधीनतेचे मानसिक, शारीरिक, कौटुंबिक आणि सामाजिक दुष्परिणाम प्रभावीपणे मांडले. या वेळी प्राचार्य डॉ. माणिक पाटील, डॉ. योगेंद्र कासट, डॉ. नीलेश महाजन, डॉ. राहुल व्यास, रोशन गांधी, महेंद्र सपकाळे उपस्थित होते. वंशिता चावरीया यांनी सूत्रसंचालन केले. सृष्टी ढाकणे यांनी आभार मानले. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद जळगाव आणि चेतना व्यसनमुक्ती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नशामुक्त भारत अभियान राबवण्यात आले.

# १२ हजारांची रोकड लंपास करणारे दोघे जेरबंद

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील शाहूनगर परिसरातील शाहू कॉम्प्लेक्स येथे पॅन्टच्या खिशातून १२ हजार ५०० रुपयांची रोकड चोरीला गेल्याच्या गुन्ह्याचा जळगाव शहर पोलिसांनी अवघ्या पाच तासांत छडा लावला. सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन सराईत आरोपींना अटक केली असून, एका विधी संघर्षित बालकास कायदेशीर प्रक्रियेनुसार ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून १२ हजार रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे.

दिनांक २६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ ते ४.३० वाजेच्या दरम्यान ही चोरीची घटना घडली. फिर्यादी अनिल राजमल कासट (वय ६२, रा. एम.आय.डी.सी., म्हाडा कॉलनी, जळगाव) हे शाहूनगर येथील शाहू कॉम्प्लेक्समध्ये असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पॅन्टच्या खिशातील १२ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम लंपास केली. या प्रकरणी कासट यांनी जळगाव शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर सीसीटीएनएस गुन्हा क्रमांक ३३५/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी जळगाव शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांना तातडीने तपास करून आरोपींचा शोध घेण्याच्या तसेच चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक शिंपी यांनी गुन्हे शोध पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष पथक तयार केले.



तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे चोरीमध्ये शहीदखान नजीरखान (वय २७, रा. युसूफ मेडिकलजवळ, गेंदालाल मिल, जळगाव), समीर खान मजीदखान (वय ३७, रा. गेंदालाल मिल, जळगाव) आणि एका विधी संघर्षित बालकाचा सहभाग असल्याची माहिती मिळाली.

संशयित आरोपी गेंदालाल मिल परिसरातील एका दुकानाजवळ असल्याची माहिती मिळताच पोलिसांच्या पथकाने तेथे धाव घेतली. यावेळी तिन्ही संशयित पोलिसांच्या हाती लागले. सुरुवातीला त्यांनी पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे देत गुन्ह्यातील सहभाग नाकारण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी कौशल्यपूर्ण आणि सखोल चौकशी केल्यानंतर त्यांनी चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

त्यानंतर दोन्ही प्रौढ आरोपींना अटक करण्यात आली असून, विधी संघर्षित बालकास कायदेशीर प्रक्रियेनुसार ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून १२ हजार रुपयांची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या पाच तासांत आरोपींचा शोध घेऊन मुद्देमाल हस्तगत करण्यात जळगाव शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला यश आले. या कारवाईमुळे शहरातील चोरीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांची तपास यंत्रणा किती तत्परतेने काम करत आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

# तृतीयपंथीय व्यक्तींसाठी एकदिवसीय शिबिराचे आयोजन

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदणीकृत तृतीयपंथीय व्यक्तींना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, महाबळ रोड, मायादेवी मंदिरासमोर, जळगाव येथे एकदिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात मतदान कार्ड, संजय गांधी निराधार योजना, रेशन कार्ड, आभा कार्ड, आयुष्मान भारत कार्ड तसेच इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन व आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून पात्र लाभार्थ्यांना योजनांची माहिती व आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन तसेच संबधित सेवांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करणार आहेत.

जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदणीकृत तृतीयपंथीय व्यक्तींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण योगेश पाटील यांनी केले आहे.

# धरणगाव तालुक्यात अन्न सुरक्षा योजनेतील १,३०० लाभार्थ्यांचे लाभ बंद

## अपात्र लाभार्थ्यांची छाननी सुरू; तालुक्यात सुमारे २० हजार शिधापत्रिका लाभार्थी

**धरणगाव। प्रतिनिधी**

अन्न सुरक्षा योजनेचा लाभ पात्र व गरजू नागरिकांनाच मिळावा, यासाठी शासनाच्या निर्देशानुसार धरणगाव तालुक्यात लाभार्थ्यांची तपासणी व सर्वेक्षण करण्यात येत आहे. या छाननीदरम्यान पात्रता निकषात न बसणाऱ्या १,३०० लाभार्थ्यांचे अन्न सुरक्षा योजनेतील लाभ बंद करण्यात आले आहेत. धरणगाव तालुक्यात एकूण सुमारे २० हजार शिधापत्रिका लाभार्थी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या सर्व लाभार्थ्यांच्या नोंदींची तपासणी करून पात्रता निकषात न बसणाऱ्या व्यक्तींची नावे कमी करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**शासकीय कर्मचारीही तपासणीच्या कक्षेत**

सर्वेक्षणादरम्यान शिपाई, शिक्षक, एसटी चालक व वाहक, अंगणवाडी कर्मचारी, पोलीस पाटील, सरकारी कर्मचारी तसेच अग्निशमन दलातील कर्मचारी अन्न सुरक्षा योजनेचा लाभ घेत असल्याचे आढळून आले आहे. पात्रता निकषात न बसणाऱ्या अशा लाभार्थ्यांचे लाभ बंद करण्यात येत आहेत. तसेच स्थलांतरित नागरिक, विवाहानंतर गाव सोडून गेलेल्या महिला आणि मृत व्यक्तींची नावे शिधापत्रिकेत कायम असल्यास त्यांचीही तपासणी करून नावे कमी करण्याची कार्यवाही केली जात आहे. नोकरीला लागलेल्या नागरिकांच्या नोंदींचीही पडताळणी करण्यात येत आहे. अन्न सुरक्षा योजनेची माहिती ऑनलाइन उपलब्ध असल्यामुळे लाभार्थ्यांच्या पात्रतेची तपासणी करणे प्रशासनाला अधिक सुलभ झाले आहे. शासनाच्या निकषांमध्ये पात्र नसलेल्या लाभार्थ्यांचा लाभ बंद करून शिधापत्रिकेतील माहिती अद्ययावत केली जात आहे. धरणगाव तहसील कार्यालयातील पुरवठा अधिकारी रेवणा कांबळे यांनी याबाबत माहिती दिली. अपात्र लाभार्थ्यांनी स्वतःहून योजनेचा लाभ सोडून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. गरजू आणि पात्र कुटुंबांपर्यंत अन्न सुरक्षा योजनेचा लाभ पोहोचविणे हा या छाननीचा मुख्य उद्देश असून, पुढील काळातही अपात्र लाभार्थ्यांची तपासणी व नावे कमी करण्याची प्रक्रिया सुरू राहणार आहे.

# गणेशोत्सवात सुरळीत होण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

**चोपडा । प्रतिनिधी**

आगामी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्ती आगमन सोहळा तसेच विसर्जन मिरवणूक सुरळीत, सुरक्षित व शांततेत पार पडावी, यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळ, चोपडा तालुका यांच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळेस सोबत डीवायएसपी सुनील पाटील व शहराचे पोलीस निरीक्षक पवन देसले उपस्थित होते.

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील विविध गणेश मंडळांकडून आगमन व विसर्जन मिरवणुका मोठ्या उत्साहात काढण्यात येतात. या पार्श्वभूमीवर मिरवणुकीदरम्यान वाहतूक कोंडी, विद्युत तारांचा अडथळा, रस्त्यांची दुरवस्था, अतिक्रमण, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी उत्सवापूर्वीच संबंधित विभागांनी संयुक्त पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी महामंडळाने केली आहे.मिरवणूक मार्गाची पाहणी करून रस्त्यांवरील खड्डे व अडथळे दूर करणे, विद्युत तारा व पोलची तपासणी करून सुरक्षितता सुनिश्चित करणे, वाहतूक नियंत्रणासाठी पर्यायी मार्ग व पार्किंग व्यवस्था करणे, तसेच



मिरवणुकीदरम्यान पुरेसा पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यासोबतच नगरपरिषद प्रशासनाने मिरवणूक मार्गावर स्वच्छता, कचरा संकलन व प्रकाश व्यवस्था करावी. विसर्जन स्थळी पुरेशी प्रकाश व्यवस्था, सुरक्षा, पिण्याचे पाणी, स्वच्छता व आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. नगरपरिषद, महावितरण, पोलीस प्रशासन आणि गणेश मंडळांचे पदाधिकारी यांची संयुक्त समन्वय बैठक घेऊन मिरवणुकीचे मार्ग, वेळा, वाहतूक व्यवस्था, विद्युत सुरक्षितता व कायदा-सुव्यवस्थेबाबत सविस्तर नियोजन करावे, अशी आग्रही मागणी महामंडळाने केली.

यावेळी सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळ, चोपडा तालुका अध्यक्ष गजेंद्र जैसवाल, गौरव सोनार, हरीश माळी, प्रेम घोगरे, अमोल भाट, विजय माळी, गिरीश भाट, अनिल वानखेडे, नरेश महाजन, शाम सोनार, जितेंद्र महाजन, सुनील बरडिया, अमृतराज सचदेव, जितेंद्र विसपुते, दिनेश जाधव, संदीप चव्हाण, विशाल भावसार, भूपेंद्र गुजराथी, विशाल भोई, दत्तू महाजन, आबा देशमुख, राजेंद्र पाटील (बिटवा), राजाराम पाटील, हितेंद्र देशमुख इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आरटीओतील लेखाधिकारी महाजनांना नोटीस!

**जळगाव :** प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) कार्यालयातील कार्यालयीन वेळेनंतर एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्याकडून संगणकावर काम करून घेतले जात असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्यानंतर आरटीओ प्रशासनाने याची दखल घेतली आहे. या प्रकरणी लेखाधिकारी सतीश महाजन यांना लेखी खुलासा सादर करण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र वर्मा यांनी दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी ही नोटीस काढली आहे. नोटीसमध्ये दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी एका फेसबुक चॅनलवर प्रसिद्ध झालेल्या व्हिडीओ क्लिपचा संदर्भ देण्यात आला आहे.

# जळगावच्या सांडपाण्याचा वीज निर्मितीसाठी पुनर्वापर!

## दीपनगर जलवाहिनीच्या कामाला वेग : तीन पंपिंग स्टेशन, भूमिगत वाहिनीचे काम सुरू

**जळगाव :** शहरात दररोज मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याची केवळ विल्हेवाट न लावता प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर भुसावळ तालुक्यातील दीपनगर येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रासाठी केला जाणार आहे. जळगाव शहर महानगरपालिकेच्या ६० एमएलडी मलनिस्सारण प्रकल्पांतर्गत सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते दीपनगर वीज निर्मिती केंद्रापर्यंत पोहचविण्याची योजना सध्या राबविण्यात येत आहे.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करत आहे. प्रकल्पांतर्गत शहरात तीन पंपिंग स्टेशन उभारण्यासह प्रक्रिया केलेले सांडपाणी दीपनगरपर्यंत नेण्यासाठी आवश्यक जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू झाले आहे. जळगाव शहरातील सांडपाणी प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्याचा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. प्रक्रिया केलेले पाणी दीपनगर येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रात वापरले जाणार असल्याने या योजनेमुळे सांडपाण्याचा पुनर्वापर होण्याबरोबरच औष्णिक वीज प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या पाण्याच्या व्यवस्थेलाही हातभार लागण्याची अपेक्षा आहे. यामुळे जळगाव शहरातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करण्यासोबतच त्याचा औद्योगिक वापर केला जाणार आहे.

प्रक्रिया केलेले सांडपाणी दीपनगरपर्यंत नेण्यासाठी जळगाव शहर महानगरपालिका हद्दीतून जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यासाठी शहरातील विकसित तसेच अविकसित भागातील काही जमिनींच्या खालून वाहिन्या टाकणे आवश्यक असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. यासाठी संबंधित भागातील जमिनींवर प्रवेश करून जलवाहिनी



टाकण्याची कामे करण्याचा अधिकार महापालिकेला असल्याचे जाहीर नोटिशीत नमूद करण्यात आले आहे. या संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५५ अन्वये महापालिकेने भोगवटादार व जमीन मालकांना सूचित केले गेले आहे.

जलवाहिनी टाकण्यासाठी आवश्यक असलेल्या जागांवर संबंधित यंत्रणेला प्रवेश करून कामे करावी लागणार आहेत. त्यामुळे ज्या भागातून जलवाहिनी जाणार आहे, त्या भागातील भोगवटादार आणि जमीन मालकांना महापालिकेने जाहीर नोटिशीद्वारे माहिती दिली आहे. जलवाहिन्यांचे प्रस्तावित नकाशे जळगाव शहर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित नागरिकांनी आपल्या भागातून जलवाहिनी प्रस्तावित आहे किंवा नाही, याची माहिती नकाशावरून तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### तीन पंपिंग स्टेशनचीही कामे

६० एमएलडी मलनिस्सारण योजनेत केवळ जलवाहिनीचा समावेश नसून तीन पंपिंग स्टेशनची कामेही प्रस्तावित आहेत. शहरातील सांडपाणी एकत्रित करून त्यावर प्रक्रिया करण्याची आणि त्यानंतर प्रक्रिया केलेले पाणी दीपनगरच्या औष्णिक वीज निर्मिती केंद्रापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था या योजनेतून उभारली जात आहे. जळगाव शहरातील सांडपाणी प्रक्रिया करून त्याचा औद्योगिक कारणासाठी पुनर्वापर करण्याचा हा प्रकल्प असल्याने शहराच्या पाणी व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही त्याला महत्त्व आहे. ६० एमएलडी क्षमतेच्या प्रकल्पातून प्रक्रिया केलेले पाणी दीपनगर वीज केंद्रासाठी उपलब्ध होणार असल्याने उपलब्ध जलस्रोतांवरील औद्योगिक वापराचा ताण कमी करण्याच्या दृष्टीनेही ही योजना उपयुक्त ठरू शकते.

## कारच्या धडकेने बिलाखेडची महिला ठार

**चाळीसगाव ।** चाळीसगाव-मालेगाव रस्त्यावर भरधाव कारने उडवल्याने एका महिलेचा मृत्यू ओढवला तर दोन महिला जखमी झाल्याची घटना मंगळवारी घडली. जखमींना तातडीने उपचारार्थ हलवण्यात आल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चाळीसगाव-मालेगावर रस्त्यावर बिलाखेड गावाजवळ मंगळवारी रात्रीच्या सुमारास एका भरधाव कारने तीन महिलांना उडवल्याने बिलाखेड्या महिलेचा जागीच मृत्यू झाला तर दोन महिला जखमी झाल्या असून त्यांच्या पायांना दुखापत झाली. बिलाखेड गावातील गावकऱ्यांना अपघाताची माहिती कळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना महिलांना तातडीने शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले व चाळीसगाव शहर पोलिसांना माहिती कळवण्यात आली. संतप्त गावकऱ्यांनी आंदोलन करीत रस्त्यावर स्पीड ब्रेकर टाकण्यासह सुरक्षा फलक लावण्याची मागणी केली व रात्री आंदोलनामुळे काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती.

## गणपती बाप्पा मोरया : गोदावरी वसतिगृहाचा परिसर दुमदुमला!

**जळगाव ।** गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग येथील मुलींच्या वसतिगृहात कायमस्वरूपी श्री गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व स्थापना सोहळा भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषाने संपूर्ण वसतिगृह परिसर दुमदुमून गेला.

या मंगलमय सोहळ्यास अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. वैभव पाटील, डॉ. प्रशांत सोळंके, डॉ. प्रेमचंद पंडित, प्रमोद भिरूड, अधीक्षिका हर्षा कोल्हे, प्राचार्या प्रा. डॉ. विशाखा गनवीर, उपप्राचार्या प्रा. जॅसिंथ धया, प्राचार्य शिवानंद



बिरादार, मुख्य परिचारिका अधीक्षक संकेत पाटील, उपमुख्य परिचारिका अधीक्षिका मनीषा खरात उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पुरोहित संदीप वैद्य यांनी कर्मचारी गणेश नांदुरकर यांच्या हस्ते सपत्नीक विधीवत मंत्रोच्चाराच्या मंगलमय वातावरणात श्री गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व स्थापना करून घेतली. वसतिगृहातील विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने या सोहळ्यात सहभाग घेतला. यावेळी सर्वांच्या सुख-शांती, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि यशासाठी श्री गणरायाच्या चरणी प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमानंतर उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# बसचालकाला शिवीगाळ पडली महागात!

## प्रवाशांसह बस थेट पोलीस ठाण्यात : दुचाकीस्वाराचा शोध

**जळगाव :** रस्त्याने बस घेऊन जात असताना एका विना क्रमांकाच्या दुचाकीस्वाराने बस चालकाला अश्लील शिवीगाळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या बस चालकाने बसमधील प्रवाशांसह थेट जिल्हापेठ पोलीस ठाणे गाठले. तेथे पोलिसांसमोर घडलेला प्रकार सांगत दुचाकीस्वारावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. पोलिसांनी संबंधित दुचाकीस्वाराचा शोध घेऊन कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर चालक बस घेऊन पुढील मार्गाला रवाना झाला. मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला.

जळगाव आगाराची एमएच २०, बीएल २४८५ क्रमांकाची बस मंगळवारी खेडी-कढोलीकडून प्रवाशांना घेऊन नवीन बसस्थानकाच्या दिशेने येत होती. बस मानराज पार्क ते शिवकॉलनी दरम्यान आली असता एका विना क्रमांकाच्या दुचाकीवरून जाणाऱ्या व्यक्तीने बस चालकाला अश्लील शिवीगाळ केल्याचे सांगण्यात आले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे बस चालक संतप्त झाला. मात्र रस्त्यावर वाद न घालता त्याने बसमधील प्रवाशांसह थेट जिल्हापेठ पोलीस ठाणे गाठण्याचा निर्णय घेतला. बस पोलीस ठाण्याच्या आवारात आणल्यानंतर चालकाने प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल वाघ यांच्यासमोर घडलेला प्रकार सांगितला. यावेळी पोलिसांनी संबंधित दुचाकीस्वाराचा शोध घेऊन त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले. तसेच बस चालकाला याबाबत तक्रार देण्यास सांगण्यात आले. मात्र चालकाने लेखी तक्रार देण्यास नकार दिला. त्यानंतर काही वेळाने चालक बस घेऊन तेथून मार्गस्थ झाला. दरम्यान, सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या बस चालकासोबत रस्त्यावर अशा प्रकारे गैरवर्तन झाल्याने प्रवाशांमध्येही काही काळ चर्चा रंगली. या घटनेनंतर पोलिसांकडून संबंधित दुचाकीस्वाराचा शोध घेऊन त्याच्यावर कारवाई केली जाते का, याकडे लक्ष लागले आहे.

cmyk